**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८.**

**मा.ह प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ११**

**सभावृत्तांत**

दिनांक – ०५/०३/२०२० वेळ – दुपारी – २.३० वा.

---

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ०५/०३/२०२० रोजी दुपारी २.३० वा. ह क्षेत्रीय कार्यालयातील **पं.दीनदयाळ उपाध्याय** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/नगरसदस्या उपस्थित होते.

**१) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत - सभापती**

२) मा.शाम गणपतराव लांडे - सदस्य

३) मा. बनसोडे राजू विश्वनाथ - सदस्य

४) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे - सदस्य

याशिवाय मा.संदीप खोत - क्षेत्रीय अधिकारी (ह क्षेत्रीय कार्यालय), श्री.कोळप एस.डी. प्रशासन अधिकारी, श्री.सुपे ए.के. लेखाधिकारी, मा.प्रदिप पुजारी –कार्य.अभियंता स्थापत्य, मा.श्री.रामदास तांबे – कार्य.अभियंता – पाणीपुरवठा, श्री.रामेश्वर मोहाडीकर - उपअभियंता जलनि:सारण विभाग, श्री.धनंजय गवळी –उपअभियंता स्थापत्य, श्री.संजय चंद्रकांत काशिद- उपअभियंता बीआरटीएस, श्री.मोहन ईश्वर खोंद्रे –उपअभियंता- झोनिपू स्थापत्य, श्री.विजय जाधव –उपअभियंता स्थापत्य उद्यान, श्री.भंडारी एस.आय –उपअभियंता स्थापत्य, श्री.मोरे चंद्रकांत – प्र.उपअभियंता (उद्यान स्था,) श्री.दिलीप धुमाळ – उपअभियंता विद्युत, श्री.आर.डी.शिरसाठ – उद्यान सहाय्यक, डॉ.विजया अविनाश आंबेडकर ज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी सांगवी रुग्णालय, श्री.कोटकर पी.बी.क.अभियंता झोनिपू, , श्री.एस.एन.गर्जे – क.अभियंता पाणीपुरवठा, श्री.अजय जाधव – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्रीम.रश्मी गणेश तुंडलवार – आरोग्य निरीक्षक, श्री.चौहान ए.एच.आरोग्य निरीक्षक, श्री.कोटीयाना व्ही.एच.-आरोग्य निरीक्षक पशवैद्यकिय अधिकारी,

----------

**मा. सभापती** – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत सभेस सुरुवात करणेत येत आहे.

**क्षेत्रीय अधिकारी** : मा.सभापती यांची मा.स्थायी समिती सभेच सदस्य पदावर नियुक्ती झालेने पुष्पगुच्छ देऊन सन्मानि त करण्यात येत आहे.

**(मा.सभापती यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला)**

**मा. सभापती** : आजच्या सभा कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** :- सभाशाखा : मागील सभा कार्यपत्रिका क्र.१० माहे फेब्रुवारी २०२० दिनांक ०६/०२/२०२० रोजीचा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : माहे फेब्रुवारी २०२० कार्यपत्रिका क्र. १० चा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा** :सन्मा. सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र.१-** रोहितराज युवा प्रतिष्ठान संस्थेस दापोडीतील नव्याने विकसीत होत असलेले स्केटींग ग्राऊंड चालविण्यास मिळणेबाबत मा.रोहित आप्पा सुदाम काटे यांचे दिनांक ००५/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्र.२-** प्रभाग क्र.३० मधील वस्त्या/कॉलनींना नाव, नंबर व क्रमांकाची दर्शनी भागात बोर्ड लावणेबाबत मा.रोहित आप्पा सुदाम काटे यांचे दिनांक ०५/०३/२०२० चे पत्र.

---------

**मा. सभापती** : आज दिनांक ०५/०३/२०२० रोजीची मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा गणसंख्येअभावी पुढील महिन्यात दिनांक ०३/०४/२०२० रोजी दुपारी २.३० पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

--------

**मा.सभापती** – मा.सर्व नगरसेवक, अधिकारी/कर्मचारी सर्वच मिटींगला उपस्थित राहिले त्याबद्दल सर्वांचे आभार मानून व मिटींग संपली असे जाहिर करण्यात आले.

सही/-
अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी- ३४.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
" ह" क्षेत्रीय कार्यालय
पिपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र.हक्षेका/कावि/ १७७/२०२०
दिनांक – १२/०३/२०२०

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८.**

**मा.ह प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ११**

**सभावृत्तांत**

दिनांक – ११/१२/२०२० वेळ – सकाळी – ११.०० वा.

---

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची दिनांक ०५/०३/२०२० रोजीची तहकूब सभा दिनांक ११/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वा.ह क्षेत्रीय कार्यालयातील **पं.दीनदयाळ उपाध्याय** सभागृहामध्ये **ऑनलाईन पध्दतीने व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे** आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/नगरसदस्या उपस्थित होते.

१) हर्षल मच्छिंद्र ढोरे - सभापती
२) मा.सुजाता सुनिल पालांडे - सदस्या
३) मा. बनसोडे राजू विश्वनाथ - सदस्य
४) मा.आशा धायगुडे – शेंडगे - सदस्या
५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत - सदस्या
६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत - सदस्य
७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र - सदस्य
८) मा.संतोष बबन कांबळे - सदस्य
९) मा.संजय गुलाब कणसे - नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय मा.संदीप खोत - क्षेत्रीय अधिकारी (ह क्षेत्रीय कार्यालय), श्री.कोळप एस.डी. प्रशासन अधिकारी, श्री.सुपे ए.के. लेखाधिकारी, मा.अनिल राऊत – प्र.कार्य.अभियंता स्थापत्य, श्री.विजयसिंह भोसले – उपअभियंता स्थापत्य, श्री.मोरे चंद्रकांत – उपअभियंता (पा.पु), श्री.जे.व्ही.पटेल – सहा.उद्यान अधिक्षक, श्री.आर.डी.शिरसाठ – उद्यान सहाय्यक, श्री.दांगडे सुनिल ज्ञानदेव – क.अ.स्थापत्य, श्री.के.एस.अंदुरे – उपअभियंता, - पापु, श्री.हरिदास सुनिल – उपअभियंता झोनिपू , श्री.एस.एन.गर्जे – क.अभियंता पाणीपुरवठा, श्रीम.यादव प्रीती- क.अभियंता जलनि:सारण, श्री.कांबळे विजय –क.अभियंता स्थापत्य, श्री.महेंद्र के.देवरे – क.अभियंता (स्था), श्री.मगर एस.एम. – क.अभियंता स्थापत्य, श्री.रमेश भोसले – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.अजय जाधव – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.उल्हास अ.देवचक्के – अतिक्रमण निरीक्षक

----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे मार्च २०२० च्या दिनांक ०५/०३/२०२० रोजीचे तहकूब सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा** : मागील सभा कार्यपत्रिका क्र.१०माहे फेबुवारी २०२० दिनांक ०६/०२/२०२० रोजीचा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : माहे फेब्रुवारी २०२० कार्यपत्रिका क्र. १० चा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा** : मागील विशेष सभा कार्यपत्रिका क्र.०१ माहे ऑक्टोंबर २०२० दिनांक ०९/१०/२०२० रोजीचा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : मागील विशेष सभा माहे ऑक्टोंबर २०२० कार्यपत्रिका क्र. ०१ चा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा** :सन्मा. सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

----------

**विषय क्र.१-** रोहितराज युवा प्रतिष्ठान संस्थेस दापोडीतील नव्याने विकसीत होत असलेले स्केटींग ग्राऊंड चालविण्यास मिळणेबाबत मा.रोहित आप्पा सुदाम काटे यांचे दिनांक ०५/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्र.२-** प्रभाग क्र.३० मधील वस्त्या/कॉलनींना नाव, नंबर व क्रमांकाची दर्शनी भागात बोर्ड लावणेबाबत मा.रोहित आप्पा सुदाम काटे यांचे दिनांक ०५/०३/२०२० चे पत्र.

----------

तदनंतर माहे मार्च २०२० च्या तहकूब सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले..**

ठराव क. २१ विषय क्र.- १

दिनांक – ११/१२/२०२० विभाग -

सुचक – मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे

**सदंर्भ –** मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे यांचेकडील दिनांक ०५/०३/२०२० चा प्रस्ताव.

मा.प्रभाग क्र. ३० दापोडी मयुर वाटीका समोरील नव्याने विकसीत होणा-या उद्यानात स्केटींग ग्राऊंड ही विकसीत करण्यात आलेले आहे त्या ग्राऊंडवर विद्यार्थ्यांना स्केटींग प्रशिक्षण देणेसाठी रोहितराज युवा प्रतिष्ठान या संस्थेस ते १० वर्षे चालविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. २२ विषय क्र.- २

दिनांक – ११/१२/२०२० विभाग -

सुचक – मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे

**सदंर्भ –** मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे यांचेकडील दिनांक ०५/०३/२०२० चा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ३० मध्ये दपोडी, फुगेवाडी, कासारवाडी वसाहतीमध्ये जवळपास अंदाजे १०,००० घरे आहेत व २५० ते ३०० गल्ल्या आहेत. या वसाहतीमध्ये सुटसुटीतपणा दिसुन येण्यासाठी गल्लीला (वस्तीला, चाळीला) नाव व क्रमांक टाकणे गरजेचे आहे. यामुळे स्थानिकांना आपले टपालपत्र, कुरीयर, ठेकेदारांना देखील सोयीस्कररित्या पत्ता मिळेल व इतर तात्काळ शोध घेण्यासाठी फायदेशीर होणार आहे. तरी दापोडी, फुगेवाडी व कासारवाडी येथील वसाहतीमध्ये प्रत्येक गल्ली, चाळ, घर व महत्वाच्या चौकाला नाव, नंबर व क्रमांक टाकण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**मा.सभापती** – मा.सर्व नगरसेवक, अधिकारी/कर्मचारी मिटींगला उपस्थित राहिले त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो व मिटींग संपली असे जाहिर करतो.

सही/-
हर्षल मच्छिंद्र ढोरे
सभापती ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी- ३४.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
प्रतापगड "ह" क्षेत्रीय कार्यालय
पिपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र.हक्षेका/कावि/२३१/२०२०
दिनांक – ११/१२/२०२०